# जाहीर नोटिस

## ड्रीम्स दि मॉल कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ड्रीम्स द मॉल, एल.बी.एस. मार्ग,भांडुप (प), मुंबई – 78.प्रशासकीय कार्यालय: युनिट क्र. B-116, पहिला मजला, EBD, नेपच्यून मॉल, एल.बी.एस. मार्ग,भांडुप (प.), मुंबई – 78. संकेतस्थळ www:dreamsredevelopment.com ई-मेल:dtmcl2013@gmail.com, दूरध्वनी: 9136848037
CIN: 74120MH2013PLC243197

ड्रीम्स द मॉलमधील मालमत्ता धारक व कंपनीचे इक्विटी समभागधारक यांच्यासाठी

**विषय: कंपनीतील मालकी हक्क व समभाग धारणा पडताळणीबाबत सार्वजनिक सूचना**

सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येते की, ड्रीम्स द मॉल कंपनी लिमिटेड ("कंपनी")च्या संचालक मंडळाने खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेवरील हक्क, मालकी व स्वारस्य तसेच कंपनीतील इक्विटी समभागधारणा यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे. ज्या कोणत्याही व्यक्ती, संस्था, संघटना किंवा कॉर्पोरेट संस्था स्वतःला संबंधित मालमत्तेचे मालक, सह-मालक,भाडेकरू धारक, हस्तांतरित झालेले, नामनिर्देशित केलेले किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क, मालकी, स्वारस्य, लाभ किंवा दावा असल्याचे सांगत असतील, तसेच कंपनीच्या इक्विटी समभागांबाबत कोणतीही हक्क सांगत असतील, त्यांनी आपले मालकी हक्क व समभागधारणा यांचे पुरावे लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यांकडे सादर करावेत.

मालकी व समभागधारणेच्या पुराव्यासोबत संबंधित सर्व कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित प्रती जोडणे आवश्यक आहे. यामध्ये बीएमसीचा ऑक्युपेशन सर्टिफिकेट, टायटल डीड, कन्व्हेअन्स डीड, नोंदणीकृत करारनामे, शेअर सर्टिफिकेट, ट्रान्सफर डीड, न्यायालयीन आदेश, इन्स्ट्रुमेंट्स किंवा कायदेशीर मालकी सिद्ध करणारी इतर कोणतीही कागदपत्रे यांचा देखील समावेश असेल.

ही सर्व कागदपत्रे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून चौदा (14) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सादर करावीत: पत्ता: युनिट क्र. B-116, पहिला मजला, EBD, नेपच्यून मॉल, एल.बी.एस. रोड, भांडुप (पश्चिम), मुंबई – 78. कृपया नोंद घ्यावी की, ही सूचना केवळ ड्रीम्स द मॉल मधील मालमत्ता/

दुकानांचे वास्तविक मालक आणि कंपनीतील इक्विटी समभागधारक यांची ओळख पटविणे व पडताळणी करण्याच्या उद्देशाने जारी करण्यात येत आहे.

मालमत्ता/कंपनीची अनुसूची: ड्रीम्स द मॉल या संकुल/इमारतीतील सर्व दुकाने/युनिट्स, जी एल.बी.एस. मार्ग, भांडुप (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत – 78 येथे स्थित आहेत.

स्थळ: मुंबई
दिनांक: 16-02-2026

सही
संचालक
(एनसीएलटी आदेश दिनांक 23-09-2025 अन्वये)
ड्रीम्स द मॉल कंपनी लिमिटेड
ड्रीम्स द मॉल, एल.बी.एस. मार्ग, भांडुप (प), मुंबई – 78.